अर्जदार/विकासक/जमिन मालक यांनी स्वखर्चाने प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची सुयोग्य व्यवस्था प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे बंधनकारक राहील.

१५ ओला व सुक्या कचऱ्या करिता सदर जागेत स्वतंत्र कंटेनरची सोय करणे आवश्यक राहील. विघटन होण्याऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडुळ खत प्रकल्प अर्जदार /विकासक/जमिन मालक यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

१६ शासन निदेशानुसार बांधकाम करताना फ्लाय ॲशचा वापर करणे बंधनकारक राहील.

१७ सौर उर्जेवर पाणी तापवण्यासाठीची यंत्रणा अर्जदार/विकासक/जमिन मालक यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

१८ विषयांकित भूखंडात Rain Water Harvesting बाबतची अंमलबजावणी करणे भूखंडधारकास बंधनकारक राहील.

१९ वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लँट उभारणे अर्जदार/विकासक/जमिन मालक यांचेवर बंधकनकारक असुन पाण्याचा फेरवापर बगीचा, झाडाची जोपासणा यासाठी करणे आवश्यक आहे.

२० प्रारंभ प्रमाणपत्र दिलेल्या कोणत्याही इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ७.५ नुसार पुर्णत्वाचे अर्जदार/विकासक/जमिन मालक यांनी सादर करुन नियम क्र. ७.६ नुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्या खेरीज कोणत्याही इमारतीचा भागश:/पुर्णत: वापर सुरु केल्यास अर्जदार/विकासक/जमिन मालक कारवाईस पात्र राहील.

२१ केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडील अधिसूचना क्र. S.O.३९९९(E) दि-०९/१२/२०१६ मधील Appendix-XIV मधील पर्यावरणाच्या अटींची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील. व सदर अटी बंधनकारक असल्याबाबत हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२२ मोठया इमारत बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या मजूरांमधील गरोदर माता,- स्तनदा माता आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांकरिता शेड बांधणे, शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाळणा घर इ. तात्पुरत्या सुविधा कंत्राटदार किंवा बांधकाम विकासक यांनी करणे आवश्यक आहे.

२३ यापूर्वी उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक यांचे पत्र क्र. जमाबंदी/कावि/६६६/२०१६, दि.२१.२.२०१७ अन्वये दिलेली बाधकाम परवानगी यापुढे रद्द समजण्यात येत आहे.

२४ प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२५ अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावा सोबतच्या बांधकाम नकाशांचे तीन प्रती स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्तावा सोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत.




(प्रतिभा भदाणे)
महानगर नियोजनकार,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक